## नि. दिवाणी मु. क्र. १९४/२०१५ मधील निशाणी क्र. ७० वरील आदेश

**(दिनांक १८.०९.२०१७)**

०१. सदरचा अर्ज हा वादी विरुध्द झालेला विना कैफियत आदेश रद्द बातल होवून झालेला विलंब माफ होवून कैफियत दाखल करुन घेणे बाबत दाखल केला आहे.

०२. वादीच्या म्हणण्या प्रमाणे, प्रतिवादी क्र. ४२ यांनी वादी विरुध्द प्रतिदावा दाखल केला असून वादीने दिनांक २३.०२.२०१६ रोजी प्रतिदाव्याची प्रत स्वीकारलेली आहे. परंतू वादी यांनी प्रत स्वीकारल्या पासून ९० दिवसाचे आत कैफियत देणे गरजेचे होते. परंतू वादीस वेळेत महत्वाची कागदपत्रे व पुरेशी माहिती प्रतिदाव्यास कैफियत देण्यास मिळालेली नसल्यामुळे वेळेत कैफियत देता आलेली नाही. त्यामुळे सदरची कैफियत देण्यास ४५ दिवसांचा उशीर झालेला आहे. तरी सदरचा झालेला विलंब हा वादी यांनी जाणीवपुर्वक केलेला नाही. तरी झालेला विलंब माफ होवून वादीची कैफियत स्वीकारण्यात येवून दाव्याचे कामकाज गुणावगुणावर चालून निर्णय होणे हिताचे व गरजेचे आहे. त्यामुळे वादीस प्रतिवादी क्र. ४२ च्या प्रतिदाव्यास कैफियत देण्याकामी झालेला विलंब माफ करुन त्याचे विरुध्द झालेला आदेश रद्द बातल होवून कैफियत दाखल करणेस परवानगी असावी म्हणून प्रस्तूतचा अर्ज दाखल केला आहे.

०३. या अर्जास अजर घेत प्रतिवादी क्र. ४२ ने आपले सविस्तर म्हणणे निशाणी क्र. ७० खाली मांडले. प्रतिवादी क्र. ४२ च्या म्हणण्या प्रमाणे वादीचा अर्ज खोटा व लबाडीचा आहे. सबब, वादीचा अर्ज नामंजूर करणेत यावा अशी विनंती केली आहे.

०४. अर्जातील कथने पाहता खालील मुद्दे उपस्थित होतात व त्या प्रत्येक मुदयास आणि निष्कर्षास अनुसरुन उत्तर मी निम्न प्रकारे देत आहे.

| मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|
| ०१. वादीने मागणी केल्या प्रमाणे विना कैफियतीचा आदेश रद्द बातल होवून व विलंब माफ करुन कैफियत दाखल करुन | .....होकारार्थी |

घेणे आवश्यक आहे का ?

०२. कोणता आदेश ? ....अंतिम ओदशाप्रमाणे

## का र ण मि मां सा

**मुद्दे क्रमांक १ व २ :**

०५. उभयंताच्या वकिलांचा युक्तिवाद ऐकल्यानंतर प्रस्तुत प्रकरणात दाखल सर्व कागदपत्राचे तसेच उभंयताना मान्य असलेल्या बाबी पाहती ही बाब आढळून येते की, वादीस प्रतिदाव्याचे समन्स प्राप्त झाल्या पासून ९० दिवसाच्या आत म्हणणे/कैफियत दाखल करणे आवश्यक असतांना वादीने प्रस्तूतचा अर्ज दिनांक ०९.०८.२०१६ रोजी दाखल केला आहे. वादीस वेळेत महत्वाची कागदपत्रे व पुरेशी माहिती उपलब्ध नसल्यामुळे कैफियत देता आले नसल्याचे कथन केले आहे.

०६. सदरचे कारण हे ग्राहय धरण्यासारखे नाही. दावा हा स्थावर मिळकती बाबत असल्याने दावा गुणावुणावर चालण्यासाठी आणि वादीचे महत्वपुर्ण हक्क सदरच्या अर्जात समाविष्ट असल्यामुळे वादीचे म्हणणे अभिलेखावर येणे गरजेचे आहे. तसेच प्रत्येक व्यक्तिला त्यांचे म्हणणे मांडण्याची पुरेशी संधी दिली पाहिजे असे नैसर्गिक न्यायदानाचे तत्व आहे. सदरचे तत्व हे वादीच्या पक्षात आहे. परंतू वादीने म्हणणे वेळेत न दिल्याने सदरच्या अर्जाचे काम लांबणीवर पडले आहे. म्हणून वादीस आदेशित करण्यात येते की, प्रतिवादी क्र. ४२ यास कॉस्ट /खर्च म्हणून रक्कम रु २५०/– दयावे. यासर्व बाबीचा विचार करुन मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी देण्यात येते. मुद्दा क्र. २ च्या उत्तरा दाखल खालील आदेश पारित करण्यात येते.

## आदेश

०१. अर्ज मंजूर करण्यात येते.

०२. वादीने प्रतिवादी क्र. ४२ यास कॉस्ट रु. २५०/- दिल्यानंतर वादी विरुध्द झालेला विनाकैफियतीचा आदेश रद्द बातल करुन वादीची कैफियत/ म्हणणे स्वीकारण्यात यावी.

०३. वरील आदेशा प्रमाणे हा अर्ज निकाली काढण्यात येते.

**(रोहिणी रा. संकपाळ)**

दिनांक १८.०९.२०१७ दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
सांगोला

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | Kotkunde A.R. |
| (b) | Court | : | Smt. R.R. Sankpal Civil Judge, J.D.& J.M.F.C.Sangola |
| (c) | Judgement /Order signed by P.O. on | : | 18.09.2017 |
| (d) | Judgement /Order uploaded on | : | 18.09.2017 |